**आय.डी.ए. १०/२०२१ पान क्र. ०४ नि. क्र. सी–१२**

**शपथेवर सुरू उलटतपास अर्जदार यांचे तर्फे श्री. खेळकरे अधिवक्ता**

०४. मी गैरअर्जदार बॅकेमध्ये तीन वर्षापासुन व्यवस्थापक म्हणुन कार्यरत आहे. अर्जदार दि. ३१/१२/२०२० रोजी सेवानिवृत्त झाले. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१९– २०२० मध्ये महाराष्ट्र शासनाची शेतक–याच्या कर्जमाफीची योजना सुरू होती. आमच्या बॅके मध्ये कर्मचा–याची एकूण मंजुर पदे ८८५ आहे. अर्जदार सेवानिवृत्त झाला त्यावेळी गैरअर्जदार बॅकेमध्ये एकूण ४५७ कर्मचारी कामाला होते. हे म्हणणे खरे आहे की दि. १२/०२/२०२० रोजी नि. यु ७ वरील पत्र गैरअर्जदार बॅकेतर्फे अर्जदार यांना त्याच्या खाती सुटया शिल्लक आहेत हे कळविण्यासाठी तसेच सदर सुटयाचा उपभोग अर्जदार घेवू शकतात याकरिता पाठविण्यात आले होते. नि. यु ३ प्रमाणे अर्जदाराने बॅकेला पत्र दिले होते व त्याप्रमाणे सुटयाचा उपभोग न घेता ९० दिवसाचा पगार देण्यात यावे असे कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की यु ९ प्रमाणे बॅकेने अर्जदाराला त्याने सुटी उपभोग न घेता काम केल्यास त्याचा पगार दिला जाईल असे कळविले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानुसार त्यांने ९० दिवस वैद्यकीय रजा न उपभोगता काम केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर ९० दिवसाचे कामाचे पैसे अर्जदार याला गैरअर्जदार बॅकेने दिलेले नाही.

हे म्हणणे खरे आहे की, बॅकेशी झालेल्या लेखी कराराप्रमाणे अर्जदार यास ९० दिवसा वैद्यकीय रजेचा पगार देणे आवश्यक होते. हे म्हणणे खरे आहे की, नि. यु ११ वरील प्रमाणे

सदर वैद्यकीय रजेचा पगार त्याला देण्यात यावा अशी विनंती देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदारानी मागणी करूनही त्याला वैद्यकीय रजेचा पगार न दिल्याने त्याने त्यांची विधित्यामार्फत नि. यु १२ वरील नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की अर्जदाराच्या शेवटचा पगार ८४८९२/—असा होता. दि. १४/०७/२०२० व दि. ३१/०७/२०२० चा ठराव अर्जदाराला कळविण्यात आला होता किंवा कसे हे मी रेकार्ड बघुन सांगु शकतो. हे मला सांगता येणार नाही की दि. ३१/१२/२०२० रोजीचा ठराव हा अर्जदाराला कळविण्यात आला नव्हता.

दि. २५/०४/२०१८ रोजी संचालक मंडळाची सभा झाली होती. हे म्हणणे खरे नाही की दि. २५/०४/२०१८ रोजीच्या ठरावाप्रमाणे विभागीय निबंधक सहकारी संस्था नागपूर याची मंजुरी घेतली नाही. सदर मंजुरी घेतल्याबातचे कोणताही कागद दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की अर्जदाराला पगाराचे पैसे देवू नये याकरिता दि. ३१/१२/२०२० रोजीचा ठराव करण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की अर्जदाराने वैद्यकीय रजा उपभोगल्या असत्या तरी दुस—या कर्मचा—यांना काम करावे लागले असते. हे म्हणणे खरे नाही की बॅक व कर्मचारी यांच्या मध्ये झालेल्या ठरावाच्या विरूध्द एकतर्फा निर्णय घेण्याचा बॅकेला अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मानव संसाधन विकास धोरण सेवा नियमावली प्रमाणे कार्यवाही सुरू आहे. सेवा नियमावली उलटतपासात साक्षीदारास दाखविल्याने त्यास नि.क्र.सी २२ हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराला रजेच्या कालावधीत काम केल्याचे पैसे दयावयाचे नाही. म्हणुण बॅकेने

खोटा ठराव केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

समक्ष

श्रावणोत्तर स्वीकृत

स्वा/—

(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
दि. १४.०७.२०२५.　　　　कामगार न्यायालय, चंद्रपुर